# Washim District Police

**Nature of Work** :- **Helping Child in distressed situation**

**Police Station** :- **Malegaon**

**Date of Good Work done** :- **30/06/2022**

**Brief of the work done :-**

मालेगाव तालुक्यातील मौजे मारसुळ येथील सात वर्षीय निष्पाप मुलीसोबत घृणास्पद अत्याचार करणाऱ्या 50 वर्षीय नराधमास पो.स्टे.मालेगाव पोलिसांनी तात्काळ अटक केली आहे.

## सात वर्षाच्या निष्पाप मुलीसोबत घृणास्पद कृत्य करणारा नराधम अटकेत

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मालेगाव** ▪ मालेगाव तालुक्यातील मौजे मारसुळ येथे सात वर्षांच्या निष्पाप मुलीसोबत घृणास्पद कृत्य करण्याचा प्रकार ५० वर्षे वयाच्या मध्यमवयीन नराधमाने केल्याची माणुसकीला काळिमा फासणारी घटना उघडकीस आली आहे. सदर नराधमास अटक करून आज मालेगांव न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला १२ जुलै पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली असुन त्याची वाशीम कारागृहात रवानगी केली आहे .

याप्रकरणी मिळालेल्या माहितीनुसार, मारसूळ गावातील सात वर्षीय निष्पाप मुलगी २८ जून रोजी दुपारी १.३० ते २ वाजेच्या दरम्यान तिच्या मैत्रिणींसोबत गावातील चावडीजवळ खेळत होती. खेळणं आटोपून त्या निरागस मुलीच्या मैत्रिणी त्यांच्या घरी निघून गेल्या, ती मुलगीही तिच्या घरी जाऊ लागली, तेव्हा सुरेश परशराम घुगे वय वर्षे ५० हा एकटाच चावडीवर बसला होता, ज्याला ती मुलगी तात्या म्हणूण हाक मारत असे. त्याने त्या निरागस बालीकेस बहाण्याने बाजूच्या गल्लीतुन निर्जन गोठ्यात नेले, तेथे आरोपीने त्या निष्पाप मुलीसोबत अश्लील वर्तन केले. मुलगी कशीतरी आरोपीच्या तावडीतून सुटून घरी पोहोचली. घरी पोहोचलेल्या मुलीची अवस्था पाहून तिच्या आईने आपली सासू आणि ननद यांना हाक मारली, तिघींनी मुलीची



प्रेमाने विचारपूस केल्यावर मुलीने रडत रडत झालेला प्रकार कथन केला, ऐकून सगळेच थक्क झाले. पीडित मुलीच्या आईने तात्काळ पती व ननदेला सोबत घेऊन मालेगाव पोलीस ठाणे गाठले . घटनेची माहिती ठाणेदार किरण वानखेडे यांना दिली. घटनेचे गांभीर्य ओळखून ठाणेदारांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्पलता वाघ, सहायक पोलीस उपनिरीक्षक रवी सैबेवार, सहायक पोलीस उपनिरीक्षक विलास ताजणे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुरेंद्र तिखिले यांना सरकारी वाहन डायल ११२ घेऊन आरोपीला ताब्यात घेण्यासाठी मारसूळ गावात पाठवले. २८ जून रोजी रात्री ९.३० वाजता पीडित मुलीच्या आईने नोंदवलेल्या तक्रारी आणि वैद्यकीय अहवालाच्या आधारे मालेगांव पोलिसांनी भादंवि कलम ३७६ सह कलम ४, ८ लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या संवेदनशील प्रकरणाचा तपास ठाणेदार किरण वानखेडे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पुष्पलता वाघ यांच्यासह सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक विलास ताजणे, पोलीस हेडकॉन्स्टेबल सुरेंद्र तिखिले हे करत आहेत.(श.प्र.)